**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :१२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : २५/३/२०१५

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -१२ सोमवार दि.३०/३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक- ३०/३/२०१५ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १४० | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ मंगळवार दिनांक १२/८/२०१४ , मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक-७ गुरूवार दिनांक १४/८/२०१४, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८ बुधवार दिनांक १०/९/२०१४ ,मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ मंगळवार दिनांक १६/१२/२०१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.१० शनिवार दिनांक ३१/०१/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १४१ | मा.श्री. किशोर डागवाले, सभापती स्थायी समिती,अ.नगर म.न.पा. व श्री. संजय झिंजे, अध्यक्ष हातगाडी ,भाजी विक्रेत संघटना, अ.नगर यांना निवेदनानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे शहरातील चितळे रोड नेहरू मार्केट येथील जागेत भाजी विक्रेते यांना तात्पुरत्या स्वरूपात व्यवसाय व्यवस्था करून देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १४३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर वॉश, ओव्हर फ्लो इत्यादीचे वाया जाणारे पाणी पुर्नउपयोगात आणणे अंतर्गत निविदा ई-निविदा क्रमांक ७२९ करिता प्राप्त झालेली मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता मालाचे वार्षिक दर करार करणेसाठी मालाचे संपूर्ण तपशील व परिमाणासह माहिती मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १४५ | अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत केडगाव भागासाठी नव्याने टाकणेत आलेल्या जलवाहिनीवरून नळ जोडणे करिता सर्व साहित्य, खोदाई, जोडाई बुजाई व टेस्टींग करणे इत्यादीसह मागविणे अंतर्गत फेर जाहिर निविदा क्र. २ करिता प्राप्त झालेली मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत इंदिरानगर, ताराबाग कॉलनी , श्रीराम कॉलनी अंतर्गत डी.आय. व HDPE वितरण व्यवस्था पुरवठा करणे, अथंरणे, जोडणे व चाचणी देणे इत्यादी करणे अंतर्गत निविदा ई - निविदा क्र.७२५ करिता प्राप्त झालेली मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४७ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहामहिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेकरीता पुर्व मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४८ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १४० - मा.स्थायी समिती सभा क्र.- ६ मंगळवार दिनांक १२/८/२०१४ , सभा क्र.-७ गुरूवार दिनांक १४/८/२०१४, सभा क्र.-८ बुधवार दिनांक १०/९/२०१४ ,सभा क्र.- ९ मंगळवार दिनांक १६/१२/२०१४ व सभा क्र.१० शनिवार दि. ३१/०१/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- १४१ ते १४८ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४०  सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ मंगळवार दिनांक १२/८/२०१४ , मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक-७ गुरूवार दिनांक १४/८/२०१४, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८ बुधवार दिनांक १०/९/२०१४ ,मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ मंगळवार दिनांक १६/१२/२०१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.१० शनिवार दिनांक ३१/०१/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ मंगळवार दिनांक १२/८/२०१४ , मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक-७ गुरूवार दिनांक १४/८/२०१४, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८ बुधवार दिनांक १०/९/२०१४ ,मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ मंगळवार दिनांक १६/१२/२०१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.१० शनिवार दिनांक ३१/०१/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक ३०/३/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्त सभेची सूचना वाचण्यात आली.

मा.श्री.संपत बारस्कर :- मा.श्री.गणेश भोसले यांची पहिलीच सभा असल्याने त्यांचा सत्कार करण्यात यावा. मी त्यांचे सर्व सदस्यांतर्फे अभिनंदन करतो.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेनुसार सुरूवात करा ते विषय वाचा.

सा.प्र.वि.श्री.गायकवाड लिपिक :- विषयाचे वाचन केले.

मा.श्री.संपत बारस्कर :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.कुमार वाकळे :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- इतिवृत्त कायम सर्वानुमते करण्यात येत आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ६ मंगळवार दिनांक १२/८/२०१४ , मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक-७ गुरूवार दिनांक १४/८/२०१४, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८ बुधवार दिनांक १०/९/२०१४ ,मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ मंगळवार दिनांक १६/१२/२०१४ व मा.स्थायी समिती सभा क्र.१० शनिवार दिनांक ३१/०१/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम मंजूर देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर  सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे  सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२

विषय क्रमांक- १४१ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** मा.श्री. किशोर डागवाले, सभापती स्थायी समिती,अ.नगर म.न.पा. व श्री. संजय झिंजे, अध्यक्ष हातगाडी ,भाजी विक्रेत संघटना, अ.नगर यांना निवेदनानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे शहरातील चितळे रोड नेहरू मार्केट येथील जागेत भाजी विक्रेते यांना तात्पुरत्या स्वरूपात व्यवसाय व्यवस्था करून देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका अतिक्रमण विभाग

संदर्भ- १. श्री. किशोर डागवाले, सभापती स्थायी समिती,अ.नगर मनपा व श्री. संजय झिंजे , अध्यक्ष हातगाडी व भाजी विक्रेते संघटना यांचे दि.१७/७/२०१४ रोजीचे निवेदन व आंदोलनाचा इशारा

२. या अनुषंगाने दि.२१/७/२०१४ रोजी पार पडलेली बैठक

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.सभापती, स्थायी समिती श्री. किशोर डागवाले व अध्यक्ष- भाजी विक्रेता संघटना यांनी एक निवेदन देवुन शहरातील चितळे रोड येथील नेहरू मार्केट या जागेत चितळे रोडवरील भाजी विक्रेत्यांची तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था करण्याचे नमुद करून तसे न केल्यास दि.२२/७/२०१४ पासुन सर्व भाजी विक्रेत्यांना मनपा आवारात आणुन भाजी विक्रीचे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे.

अ.नगर मनपाचे सि.स.नं.२०८ ही शहर गावठाणातील चितळे रोड येथील मिळकत आहे. या मिळकती मध्ये तत्कालीन नगरपरिषदेने बांधलेली नेहरू मार्केट ही भाजी बाजारा साठीची इमारत, सदर ठिकाणी खाजगी करणातुन भाजी मार्केट व व्यापारी संकुल उभारावयाची असल्याने व सध्याची अस्तित्वातील इमारतीचा वापर भाजी विक्रेते करीत नसल्याने तसेच इमारतीची झालेली दुरावस्था इत्यादी बाबींचा विचार करून झालेल्या निर्णयानुसार या विभागाने दि.२८/८/२०१० ते दि.२/९/२०१० या कालावधीत सदर अस्तित्वातील इमारत पाडलेली आहे व तेथील मटेरियलची विल्हेवाट लावुन मा.आयुक्त यांचे दि.४/९/२०१० चे मान्यतेने इकडील जा.क्र.८३५ दि.४/९/२०१० अन्वये जमीन सम पातळीत केलेला संपुर्ण खुला भुखंड आज रोजी शहर अभियंता यांचे ताब्यात देण्यांत असुन येथुन पुढे सदरचे भुखंडात अतिक्रमणे होवु न देण्यांचे व इतर दुरूपयोग होवु न देण्यांचे संपुर्ण संरक्षणाची जबाबदारी त्यांची राहील असे कळविलेले आहे.

इकडील माहिती नुसार सदर भुखंडावर खाजगी करणातुन व्यापारी संकुल उभारावयाचे असल्याने निविदा भरताना,निविदा धारकांना सदरचा भुखंड खुला व अतिक्रमण विरहीत असल्याचे दिसुन आल्यास त्यांना निविदा भरण्यांस अधिक पोषक वातावरण तयार होवुन सदरचा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वीत होईल, या उद्देशाने तत्कालीन आयुक्त यांनी सदरची जागा सक्तीने खुली ठेवण्यांच्या सुचना दिलेल्या होत्या न त्यानुसार या विभागाने आज तागायत सदरचा भुखंड खुला ठेवलेला आहे.

सदर भुखंडावर व्यापारी संकुल लवकरात लवकर उभारणेसाठी आंदोलने झालेली असुन सदरचे प्रकरण बांधकाम विभागामार्फत प्रगती पथावर आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता मा.सभापती व इतर यांचे मागणीनुसार चितळेरोडवरील भाजी विक्रेत्यांना सदर जागेत तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था करून देता येईल काय या अनुषंगाने वरील संदर्भ क्र.२ अन्वये मा.आयुक्त यांचे कडेस बैठक पार पडली. सदर बैठकीस मा.सभापती स्थायी समिती, भाजी विक्रेते प्रतिनिधी, उपायुक्त , शहर अभियंता , अतिक्रमण विभाग प्रमुख उपस्थित होते. सदर बैठकीत मा.आयुक्त यांनी या भुखंडावर व्यापारी संकुलाचे काम हाती घ्यावयाचे असल्याने सदरचा भुखंड रिकामा ठेवणे आवश्यक असल्याचे नमुद केले. त्यावर श्री. संजय झिंजे, भाजी विक्रेते संघटना व सभापती यांनी सदर भुखंडावर व्यापारी संकुल उभारण्याची कार्यवाही जरूर करावी.

त्यावेळेस आमचे सहकार्य राहील. परंतु काम सुरू करे पर्यत चितळे  रोडवर बसलेले सर्व भाजी व फळ विक्रेते यांना तो पर्यत तात्पुरत्या स्वरूपात या जागेत बसण्यांची परवानगी द्यावी त्यामुळे चितळे रोड अतिक्रमण मुक्त होवुन वाहतुकीस पुर्ण खुला होईल. तसेच रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन अतिक्रमण धारकांचाही प्रश्न सुटेल असे नमुद केले असता मा.आयुक्त यांनी व्यापारी संकुल बांधणेसाठी निविदा धारकांना सदर भुखंड खुला दिसणे आवश्यक असल्याचे तसेच तांत्रिक व कायदेशीर  दृष्टया आवश्यक असल्याचे सांगितले. या करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवुन मा. समितीने निर्णय घेणे उचित राहील असे सांगितले.

वरील सर्व बार्बीचा व वस्तुस्थितीचा विचार करता सदर भुखंडावर बांधावयाचे व्यापारी संकुलाचे सद्यस्थिती बाबत मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय घेवुन, चितळे रस्त्यावरील भाजी, फळ विक्रेते व इतर यांना  तात्पुरते स्वरूपात पर्यायी व्यवस्था म्हणुन जागा द्यावी किंवा कसे याबाबत प्रस्ताव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे अतिक्रमण विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सद्यस्थितीत सदर भाजी मार्केटचा भुखंड खुला आहे. मा. जनरल बोर्ड ठराव नं.४९ दि.१५/३/२०१३ अन्वये नेहरू मार्केट व्यापारी संकुल व भाजी मार्केट इमारत महापालिकेमार्फत बांधण्यात यावी असा निर्णय झालेला आहे. अदयापपर्यत सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व प्रशासकीय मान्यता झालेली नाही. सदर खुल्या भुखंडावर तात्पुरत्या स्वरूपात भाजी, फळ विक्रेते यांना परवानगी देण्याबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घेणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत टिपणणी  नुसार व आज दि.२१/७/२०१४ रोजी झालेला  बैठकीनुसार विषयांकित मागणीबाबत प्रकरण चर्चेसाठी मे. स्थायी समिती सभेत सादर करणे योग्य राहील. तथापि मे.आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफीस रिपोर्ट वाचा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :-नेहरू मार्केटचे बांधकाम करताना सध्या रस्त्यावर बसून भाजी विक्री करणारे व्यावसायीक बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अडचण करणार नाहीत हे पहावे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- नेहरू मार्केट बांधकाम करताना रस्त्यावरील भाजी विक्रेते अडचण करतील,कोर्टात जातील. सध्या जागा मोकळी राहू द्या, रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांना नेहरू मार्केटच्या जागेत बसण्यास परवानगी देउ नका.सदर ठिकाणी नेहरू मार्केट बांधकामाच्या निविदा काढून कार्यवाही स सुरूवात करावी .

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केटच्या समोरील रस्त्यावर भाजी विक्रेते बसून आपला व्यवसाय करीत आहेत.भाजी खरेदी करणारेही रस्त्यावर वाहने लावून भाजी खरेदी करतात,त्यामुळे वाहतूकीस मोठया प्रमाणावर अडथळा निर्माण होत आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :-रस्त्यावर बसणा-या भाजी विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपात नेहरू मार्केटच्या जागेमध्ये बसविण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- रस्त्यावर बसून भाजी विक्री करणा-यांना तात्पुरत्या स्वरूपात आत बसून व्यवसाय करू देता येईल परंतू त्यांना टपरी लावता येणार नाही. तसेच तात्पुरत्या स्वरूपातील बांधकाम,राहूटी वजा तंबू टाकता येणार नाही. त्यांनी फक्त त्याठिकाणी दिवसभर थांबून आपला व्यवसाय करायचा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- नेहरू मार्केट च्या जागेमध्ये बसून भाजी विक्री व्यवसाय करणा-या व्यावसायीकांना जागेचा ताबा द्यावयाचा नाही. बांधकाम सुरू करतेवेळी त्यांचेकडून जागा रिकामी करून घ्यावयाची आहे.

मा.सभापती साहेब :- पाठीमागे अमरधाम समोर रस्त्यावर बसून भाजी विक्री करणा-या व्यावसायीकांना गाडगीळ पटांगण येथे तात्पुरत्या स्वरूपात भाजी विक्री व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली आहे. जागेचा ताबा त्यांनाही देण्यात आलेला नाही.

मा.श्री.सचिन जाधव :- नेहरू मार्केट मध्ये भाजी विक्री करणा-यांना बसविणे कामी नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- भाजी विक्रेते आत बसविण्यापेक्षा त्याठिकाणी नेहरू मार्केट बांधकाम सुरूवात करण्यात यावी. त्या प्रक्रीयेची माहिती द्या.

प्रकल्प विभाग श्री.मेहेत्रे :- नेहरू मार्केट बांधकाम करण्याकरीता यापुर्वी निविदा काढल्या होत्या. त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आता पुन्हा नव्याने निविदा काढून मार्केट बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- सावेडी उपनगरातही भाजी मार्केट आहे. परंतू तेथे भाजी विक्रेते बसत नाहीत. तेथे रात्री - अपरात्री गैरप्रकार चालतात. भाजी विक्रेत्यांना रस्त्यावर बसू देउ नका.

मा.श्री.बेहेरे,उपायुक्त (कर) :- सावेडी उपनगरातील भाजी मार्केट मधील ओटयांची निविदा काढण्यात आलेली होती.त्यास अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- रस्त्यावर बसणारे भाजी विक्रेते यांना रस्त्यावर बसून भाजी विक्री करू देउ नये. अतिक्रमण विभागाने त्यांचेवर कारवाई करावी.

मा.श्री.सचिन जाधव :- नेहरू मार्केट मध्ये भाजी विक्रेते बसवल्यानंतर बाहेर रस्त्यावर इतर विक्रेत्यांना बसू देउ नये. बाहेर रस्त्यावर कोणीही विक्रेता बसणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

मा.सभापती साहेब :- इतर भाजी विक्रेत्यांना बाहेर बसू द्यायचे नाही.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- बाहेर बसणा-या भाजी विक्रेत्यांना बाहेर बसू न देण्यासाठी मनपा प्रशासनाने एक पथक तयार करावे.

मा.श्री.दिप चव्हाण :- नेहरू मार्केट बांधकाम करणे कामी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव करण्यात आलेला आहे, तो पहा.सदर बांधकाम करणेकरीता एक नियोजन कमिटी स्थापन करण्यात आलेली होती. त्या कमिटीने काय कार्यवाही केली याचा काहीही उल्लेख नाही. दि.१५/३/२०१३ च्या ठरावाचे काय झाले,त्यानुसार कार्यवाही का करण्यात आली नाही. सदर विषयाशी अतिक्रमण विभागाचा काहीही संबंध नाही. नगररचना विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक होते. दि.१५/३/२०१३ रोजी झालेल्या ठरावाचे आज अस्तित्व आहे किंवा नाही त्या ठरावा नुसार कार्यवाही करणार का. ठराव केल्यानंतर प्रशासन कार्यवाही का करीत नाही. जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळविण्या साठी मान्यता देण्यात आली होती. नगरसेवकांची एक समिती गठीत करावी असाही उल्लेख करण्यात आला होता. त्याप्रमाणे आजपर्यंत काहीएक कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती साहेब :- दि.१५/३/२०१३ च्या ठरावानुसार समिती गठीत करणेबाबत मा.महापौर साहेब यांना आपणामार्फत एक पत्र देउ.

मा.श्री.दीप चव्हाण :- नेहरू मार्केट बांधकामाकरीता वेळोवेळी ३ ठराव करण्यात आलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.सदर कामाकरीता निधी मागणी केली आहे काय याचे प्रशासनाने उत्तर द्यावे.

प्रकल्प विभगा श्री.मेहेत्रे :-सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात नेहरू मार्केट बांधकाम करण्याबाबत ठराव करण्यात आला. निविदा तात्काळ मागवून कार्यवाही करण्यात यावी.निविदा न आल्यास मनपाने सदर बांधकामाकरीता निधी उभारणी करण्यास कर्ज उभारणी करावी.असे नमूद केले आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- सदरचा विषय हा नगररचना विभागाशी संबंधीत असताना मेहेत्रे यांचा संबंध काय.

प्रकल्प विभगा श्री.मेहेत्रे :- महानगरपालिके मार्फत जे प्रकल्प राबविले जातात त्यांचे कामकाज मा.आयुक्त सोा. यांचे मंजूरीने माझ्याकडे सोपविण्यात आले आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- दि.१५/३/२०१३ च्या ठरावानुसार सदरचा विषय घेतला आहे काय. सदर कामाकरीता चालू आर्थीक वर्षा च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे काय.सदर बांधकामाकरीता ठराव करण्यात आलेले असतानाही आज विषय का घेण्यात आला.मागील ठराव रद्द करण्याची प्रथा नाही काय. सदरचा विषय नगररचना विभागाकडून येणे आवश्यक होते.अतिक्रमण विभागाने नगररचना यांचे विभागामार्फत काम करावे.

मा.श्री.बेहेर उपायुक्त कर :- मा.महासभेच्या ठरावानुसार सदर ठिकाणी बांधकाम करण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :- दि.१५/३/२०१३च्या ठरावानुसार कार्यवाही करायला हवी. सदर ठिकाणी बांधकामाकरीता किती जागा आहे. त्या ठिकाणी किती भाजी विक्रेते बसतील. सर्वाना जागा मिळाली नाही तर उर्वरीत शिल्लक भाजी विक्रेत्यांचे काय करणार. त्यांना पर्यायी जागा काय करणार. नेहय मार्केट इमारत असतानाही भाजी विक्रेते त्या इमारतीमध्ये न बसता बाहेर रस्त्यावर बसून भाजी विक्री करत होते. सदर बांधकाम झाल्यानंतर ते इमारतीत बसतील काय.त्याकरीता धोरण ठरवून घेण्यात यावे.

प्रकल्प विभगा श्री.मेहेत्रे :- नेहरू मार्केट बांधकामाकरीता ११,००० चौ.फुट जागा बांधकामास उपलब्ध आहे.

मा.सभापती साहेब :- अतिक्रमण विभागाने याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.दीप चव्हाण :- या विषयाबाबत पूर्ण अभ्यास करून विषय पुन्हा परत घ्या.आजमितीस रस्त्यावर बसणा-या भाजी विक्रेत्यांची यादी तयार करा, त्यांची संख्या पहा. त्यांचेबाबत एक धोरण ठरवा किती लोक सदर ठिकाणी बसतील ते पहा. २०१३ मध्ये सदर बांधकामाकरीता झालेला रद्द करावा लागेल. लवकरात लवकर निविदा काढून सदर काम सरू करण्यात यावे. सदर भाजी वाल्यांना ठराव करून नेहरू मार्केटच्या जागेत का बसवायचे प्रशासनाच्या पत्रानुसार बसविता येणार नाही का.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाने त्यांना त्यांच्या पत्रानुसार सदर व्यावसायीकांना आत बसण्यास परवानगी दिल्यास नंतर तुम्हीच परत विचारणा करणार.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- भाजी विक्रेत्यांना नेहरू मार्केटच्या मोकळया जागेत तात्पुरते बसण्याची परवानगी देण्यात यावी.नेहरू मार्केटच्या जागाी मार्केट बांधण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- चितळे रोडवरील भाजी विक्रेत्यांना नेहरू मार्केटच्या मोकळया जागेत तात्पुरते बसू दया.तसेच तेथे नविन मार्केट बांधण्याची कार्यवाही त्वरीत करा.

मा.सभापती साहेब :- चव्हाण साहेबांचे म्हणणे नोंदवून घ्या. भाजी विक्रेत्यांना नेहरू मार्केटच्या मोकळया जागेत बसण्याची परवानगी देण्यात यावी.तसेच नेहरू मार्केटच्या जागाी मार्केट बांधण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

**ठराव :-** मा.श्री. किशोर डागवाले, सभापती स्थायी समिती,अ.नगर म.न.पा. व श्री. संजय झिंजे, अध्यक्ष हातगाडी ,भाजी विक्रेत संघटना, अ.नगर यांना निवेदनानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या,चितळे रोड नेहरू मार्केट येथील मोकळया जागेत भाजी विक्रेते यांना तात्पुरत्या स्वरूपात भाजी विक्री व्यवसाय करणे करीता बसू देण्यास ही सभा मान्यता देत आहे.येथे भाजी विक्री करणा-यांना तात्पुरत्या स्वरूपात आत बसून व्यवसाय करू देता येईल परंतू त्यांना टपरी लावता येणार नाही. तसेच तात्पुरत्या स्वरूपातील बांधकाम,राहूटी वजा तंबू टाकता येणार नाही. तसेच सदर ठिकाणी मार्केट चे बांधकाम सुरू करते वेळी तेथे बसणा-या विक्रेत्यांनी त्वरीत जागा रिकामी करून देणे आवश्यक आहे.तसेच या मोकळया जागेवर नविन मार्केट बांधण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. चितळे रोडवर मार्केटच्या बाहेर बसून भाजी विक्री करू नये व वाहतुकीस अडथळा होवू नये या करीता महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाचे पथक सतत कार्यरत ठेवावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४२ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये ५,४२,६३०/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदीचे कामासाठी से.नि. तहसिलदार /२ सर्व्हेअर कार्यरत आहे.स्थायी समिती ठराव क्रमांक- ४० दिनांक ०८/०७/२०१४ अन्वये ६ महिने कामाची मंजुरी दिलेली आहे. सदरची मुदत दिनांक ३१/०१/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

त्यांनी केलेल्या व करावयाचे प्रलंबित कामाची माहिती खालील प्रमाणे

| अ नं. | तपशील | एकुण मिळकती | | मनपा नावाने नोंदी झालेल्या | | नोंदी साठी प्रलंबित | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खुल्या , इतर | रस्ते | खुल्या, इतर | रस्ते | खुल्या , इतर | रस्ते |
| १ | सर्व्हे नंबर मधील मिळकती | १००१ | १३०१ | ७७० | ८९० | २५७ | ४११ |
| २ | ग्रामपंचायती कडील | २६ | -- | २६ | -- | -- | -- |
| ३ | सिटी सर्व्हे कडील | ३४२ | १२ | १६८ | १२ | १७४ | -- |
| ४ | नरयो क्र.१ व २ मधील अरक्षीत | १२ | -- | -- | -- | १२ | -- |
| ५ | नरयो क्र.३ मधील अरक्षीत | ९ | -- | ९ | -- | -- | -- |
| ६ | नरयो क्र. ४ मधील अरक्षीत | ११ | -- | ८ | -- | ३ | -- |
| ७ | नरयो क्र. ३ मधील रेखांकनातील | ५० | ३८ | ८ | -- | ४२ | ३८ |
| ८ | नरयो क्र.४ मधील रेखांकनातील | ४५ | ५४ | १० | १५ | ३५ | ३९ |
| ९ | पाणी पुरवठा | ५ | -- | २ | -- | ३ | -- |
| १० | सर्व्हे नंबर/सि.स.नं.पैकी नसलेल्या मिळकती | ४४ | -- | -- | -- | ४४ | -- |
| | **एकुण** | **१५४५** | **१४०५** | **९७५** | **९१७** | **५७०** | **४८८** |

**केलेले काम-**

१. वर नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या नावाने झालेल्या मिळकती पैकी ४५५ मिळकतीची तलाठी व नगर भूमापन अधिकारी यांचे कडील मुळ रेकॉर्ड वरून तपासणी करून तफाती बाबत कार्यवाही केलेली आहे.
२. एकुण २२५ मिळकतीची प्रकरणे तयार करून संबंधित खात्याकडे पाठविलेली आहेत.
३. सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ , ४२१-अ, अंतीम भूखंड क्रमांक १११ चे अपीलात व फेर चौकशीत लेखी युक्तीवाद व पुरावेचे कागदपत्रांच्या नक्कला काढून दाखल केलेल्या आहेत.
४. नगर रचना योजना क्रमांक- १ व २ मंजूर योजनेचा अंमल घेणेबाबत भूमी अभिलेख खात्याशी संपर्क साधून लेखी स्मरण पत्रे वारंवार दिलेली आहेत.

५. नगररचना योजना क्रमांक ३ व ४ मंजूर रेखांकनातील मिळकतीस नोंदी साठी रेखांकन , खरेदी खत, सुची क्रमांक- २ बंद ७/१२ इत्यादी नक्कला काढून २० प्रकरणे नगर भूमापन अधिकारी यांचे कडेस पाठविलेली आहेत.

६. पिंपळगांव माळवी तलावासाठी संपादीत ७०० एकर क्षेत्राचा मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे ७/१२ तयार करणेबाबत भूमि अभिलेख खात्यास लेखी स्मरण पत्रे दिलेली आहेत.

७. सर्व्हेअर यांनी आतापर्यंत अतिक्रमण व रस्त्याच्या कामासाठी ८९१ व पाणीपुरवठा फेज-२ चे कामासाठी ९५२ मिळकतीच्या दोन्ही बाजू कडील रेखांकनाप्रमाणे समक्ष मोजणी करून हद्दी निशाण्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना दाखवून दिलेल्या आहेत.

८. २४८ खुल्या जागेच्या मोजणी करून रेखांकनातील ७/१२ व मिळकत पत्रिक या वरील क्षेत्राचा ताळमेळ घेतलेला आहे.

## नोंदी साठी प्रलंबित प्रकरणात करावायाची कार्यवाही

१. पिंपळगाव माळवी तलासाठी संपादीत क्षेत्राचा महानगरपालिकेच्या नावाने ७/१२ तयार करणेच्या प्रकरणात भूमि अभिलेख खात्याने काही मुद्दे उपस्थित केल्यास त्याचा खुलासा करावा लागणार आहे. त्यांचे कडील कार्यवाही पुर्ण झालेनंतर तहसिलदार, नगर यांचे कडून ७/१२ तयार करणेसाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे व ७/१२ तयार झाल्यानंतर सदरच्या क्षेत्राची मोजणी करण्याबाबतची कार्यवाही करावी लागणार आहे.

२. सिटी सर्व्हे नंबर ४२१-अ, अंतिम भूखंड क्रमांक-१११ , मधील मिळकतीची अपील दाखल करणे बाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३. सावेडी येथील ५० मिळकतीचे संबंधीत मुळ मालकाकडून ताबे पावती घेवून नोंदी साठी प्रकरणे पाठविण्याचे आहेत.

४. नोंदी झालेल्या ३२० मिळकतीची तलाठी कार्यालयातील ७/१२ वरून क्षेत्राची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

५. नोंद झालेल्या ९७५ मिळकतीचे ७/१२ , फेरफार , मिळकत पत्रिकेच्या नक्कला काढून घ्यावयाचे आहेत.

६. नगर भूमापन अधिकारी यांचेकडे नोंदी साठी पाठविलेल्या प्रकरणात रेखांकन खरेदी खत, सुची क्रमांक-२, अकृषीक आदेश, मिळकत पत्रिका इत्यादी कागदपत्रांची मागणी केलेली आहे. यातील सर्व कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नाही. त्यांच्या नकला संबंधीत खात्याकडून काढून घ्यावयाचे आहेत. तसेच काही प्रकरणात ताबे पावती करून घेवून त्याप्रमाणे प्रकरणे तयार करून नोंदी साठी पाठविणे आवश्यक आहे.

७. सि.स. नंबर ४७७०-अ, अ.भू.क्र.१११,१९३,१९५ या मिळकती न्याय प्रविष्ट आहेत त्यामध्ये आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

८. नोंदी झालेल्या ९७५ व शिल्लक ५२६ खुल्या जागेच्या मोजणी करावी लागणार आहे. क्षेत्रात तफावत असल्यास पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

९. मलनिस:रना साठी वाकोडी व चाहूराणा बु. येथील संपादन केलेल्या २० एकर क्षेत्रास ताबे पावती वरून प्रकरण तयार करून नोंदीसाठी तहसिलदार यांचेकडेस पाठवावे लागणार आहे.

१०. नगररचना योजना क्र. १ व २ मंजूर योजनेचा अधिकारी अभिलेखात अंमल घेणेसाठी भूमि अभिलेख खात्याचे मागणीप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

पथकातील से.निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी नोंदीचे काम समाधान कारक केलेले आहे. नोंदीचे काम दुस-या खात्याकडून करून घ्यावी लागत असल्याने विलंब होत आहे. उदा. पिंपळगाव माळवी येथील संपादीत जमिनीस नोंद करणेबाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी आदेश देवून १ वर्षाच्या कालावधी झालेला आहे. परंतू अदयाप पावेतो यामध्ये भूमी अभिलेख खात्या कडून कार्यवाही झालेली नाही. इतरही अनेक मिळकतीस नोंदीसाठी साधारण ५-६ महिन्याचा कालावधी लागतो.

त्याचप्रमाणे काही मिळकतीबाबत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या दाव्यात व भूमि अभिलेख खात्याकडे केलेल्या अपीला कामी सुनावणी दिवशी हजर राहणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत प्रलंबित प्रकरणात कार्यवाही पुर्ण होणेचा निश्चित कालावधी सांगता येत नाही आतापर्यंत नोंदी झालेल्या व प्रलंबित सर्व प्रकरणाची पथकातील अधिकारी / कर्मचारी यांना पुर्ण माहिती झालेली आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणात कोणती कार्यवाही करावयाची हे त्यांना ज्ञात आहे. तसेच पाणी पुरवठा फेज-२ व रस्त्याचे कामे सुरू करताना मोजणी करून हद्दी निश्चित करणे गरजेचे असते त्या वेळी पथकातील मोजणीदार यांची सातत्याने गरज भासणार आहे. पुढील कामाची मंजुरी न दिल्यास नोंदीचे काम अपुर्णावस्थेत राहणेची शक्यता नाकारता येत नाही.

आतापर्यंत झालेल्या कामावरून पालिकेच्या एकूण मिळकती, क्षेत्र, ठिकाण याची अदयावत माहिती उपलब्ध आहे. अशाच प्रकारे शिल्लक मिळकतीचे काम पुर्ण होणे महत्वाचे आहे. तसे न झाल्यास मिळकतीचे बेकायदेशीर हस्तांतरण होण्याची शक्यता नाकरता येत नाही. कार्यरत मिळकत व्यवस्थापन पथकावर झालेला व होणारा खर्च अनाठाई नसून तो पालिकेच्या दृष्टीने फायदेशीर आहे. प्रलंबित असलेल्या मोठया क्षेत्राच्या प्रकरणात कार्यवाही पुर्ण होणेचा निश्चित किती कालावधी लागणार याची खात्री नाही. ६ महिने मंजुरीचे नंतर पुढील मंजूरीस बराच कालावधी लागतो.

प्रामुख्याने मौजे- पिंपळगाव माळवी येथील महानगरपालिकेच्या नावाने ७/१२ तयार होणे अत्यंत महत्वाचे आहे या प्रकरणात काही कार्यवाही करणे आवश्यक झाल्यास, त्यावेळी पथकातील अधिकारी / कर्मचारी यांना या प्रकरणात चांगल्या प्रकारची माहिती असल्याने त्यांची गरज भासणार आहे. आशावेळी कामाची सलगतता व एकसुत्री पणा रहावा म्हणून त्यांना ११ महिने कामाची मंजुरी देणे आवश्यक वाटते. माहे डिसेंबर २०१४ मध्ये झालेल्या महासभेच्या बैठकीत अनेक सदस्यांनी मिळकत नोंदीचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे. त्यासाठी ११ महिने काम देणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

स्थावर मिळकत व्यवस्थापना साठी कार्यरत असलेले से.नि. तहसिलदार , नायब तहसिलदार / दोन भूकरमापक यांना स्थायी समितीने दिनांक ०८/०७/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत ६ महिने कामाची रक्कम रूपये २,९६,०००/- चे खर्चाची मंजुरी दिलेली आहे. त्याची सरासरीने दर महिन्यास रूपये ४९,३३०/- येत आहे. त्याप्रमाणे पुढील ११ महिने कामाची व होणारी रक्कम रूपये ५,४२,६३०/- यास खर्चाची मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही. तसेच सदर खर्च [आस्थापना] या बजेट हेड खाली खर्च करण्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

सोबत केलेल्या व करावयाचे कामाचे तक्ते जोडले आहेत.

मानधन/[आस्थापना]

बजेट तरतुद- ५६,१०,०००/-

खर्च - ३,४५,३१०/-

शिल्लक तरतुद - ५२,६४,६९०/-

येणेप्रमाणे प्र.नगररचनाकार यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मुळ प्रकरण पहाता सदरहू करारनाम्याची मुदत दि.३१/१/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे. मनपाच्या फायदा व पथकाच्या सेवेची निकड पहाता प्रतिमाह रूपये ४९,३३०/- इतके मानधनावर सध्याच्या पथकास ११ महिने मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्तावीत "अ" प्रमाणे मा.स्थायी समिती मंजुरीने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, विभागने प्रस्तावीत केलेनुसार "अ" मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केलेनुसार व मु.ले.प. यांचे अभिप्रायानुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-_स्थावर मिळकतीस नोंदी अदयावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दीप चव्हाण :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिंपळगाव माळवी तलाव येथील ७०० एकर जागेस महानगरपालिकेच्या नावाची नोंद का होत नाही याची माहिती द्यावी. सदरचे काम करणारे मानधनावरील कर्मचारी कधीपासून काम करतात याची माहिती द्यावी.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- सदर कर्मचारी हे २००९ पासून आपल्याकडे मानधनावर कार्यरत आहेत. त्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली आहे. सदर कर्मचारी हे महसूल विभागाकडील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. त्यांना या कामाचा अनुभव आहे.

मा.श्री. दीप चव्हाण :- यापुर्वी चे नगरपरिषदेकडील रेकॉर्ड विभागाचे कामकाज पहाणारे अधिकारी - कर्मचारी कोठे काम करतात. तसेच या कर्मचा-यांना मानधनावर नेमणूक केल्यानंतर महापालिकेतील कर्मचा-यांना सदर कामाबाबत प्रशिक्षीत करणे आवश्यक आहे. मानधनावर कर्मचारी किती दिवस ठेवणार.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-सदर कर्मचारी हे २००९ पासून वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीनुसार कार्यरत आहेत.

मा.श्री.सोनवणे, आस्था.प्रमुख :- महानगरपालिकेच्या मालमत्तांची नोंद ठेवण्याकरीता आस्थापना सूचिवर इस्टेट प्रॉपटी क्लार्क हे पद आहे.ते बांधकाम विभागाकडे आहे.

मा.श्री.चारठाणकर, उपायुक्त सा. :- महानगरपालिकेच्या मालमत्तांची नोंद ठेवण्याकरीता महसूल विभागाकडून सेवानिवृत्त कर्मचा-यांना मानधनावर घेउन त्यांचेकडून हे काम करून घेण्यात येत आहे. सदर कर्मचारी हे सेवा निवृत्त तहसीलदार ,भुमि अभिलेख कार्यालय,येथील असल्याने त्याना या कामाचा प्रदिर्घ अनुभव आहे. त्याचा आपल्या महानगरपालिकेस फायदा होत आहे. त्यांचे काम समाधानकारक आहे. सदर कर्मचारी हे सेवा निवृत्त असल्याने त्यांना कायम करण्याचा प्रश्न येत नाही. महानगरपालिकेच्या किंमती जागेंचा डेटा संकलीत करण्याचे काम त्यांचेमार्फत केले जाते.

मा.श्री.दीप चव्हाण :- सदर कामाकरीता मनपा. कर्मचारी प्रशिक्षीत करा. कर्मचारी कमी असल्यास नवीन भरती करा.

मा.श्री.कुमार वाकळे :- पथकास मुदत वाढ देण्यात यावी.
मा. श्री. संपत बारस्कर :- कामाची सलगता व एकसुत्री पण पहाता या पथकास मुदत वाढ देण्यात यावी.
मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस महानगरपालिकेचे नावाच्या नोंदी अदयावत करणेच्या कामासाठी नगररचना विभागा कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा. श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४३ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर वॉश, ओव्हर फ्लो इत्यादीचे वाया जाणारे पाणी पुर्नउपयोगात आणणे अंतर्गत निविदा ई-निविदा क्रमांक ७२९ करिता प्राप्त झालेली मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग

संदर्भ :- १. दि.१३/१/२०१५ रोजीची छाननी समिती

२. मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांचे दि.१३/०१/२०१५ रोजी दर वाटाघाटी विषयीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १६/१२/२०१४ रोजी खालील कामासाठी प्राप्त झालेल्या ई - निविदांचा आर्थिक दरांचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत आला असून संगणकीय ई - निविदा रिझल्र्ट तक्त्याचे अवलोकन करून त्यामध्ये प्राप्त झालेल्या एकच निविदेबाबत तक्त खालील प्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

**ई - निविदा क्र.७२९-** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर वॉश, ओव्हर फ्लो इत्यादीचे वाया जाणारे पाणी पुर्नउपयोगात आणणे.

**अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ५१,७७,९३०/-**

**प्राप्त झालेल्या निविदेच्या दराचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन , अहमदनगर | ४०.००% जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने ई - निविदा क्र.७२९ करीता प्राप्त झालेले मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचा देकार अंदाजपत्रकीय निविदा रकमेच्या ४०.००% जादा म्हणजेचे रू.७२,४९,१०१/- इतके आलेले आहेत.

परंतू ठेकेदाराने विषयांकित निविदेमध्ये नमूद केलेले दर हे अत्यंत अवाजवी वाटत असल्याने त्यांना दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटीसाठी दि.१३/०१/२०१५ रोजी रोजी मा.उपायुक्त (सा.) यांचेकडे निविदा छाननी समितीपुढे बोलावून घेवून दराबाबत वाटाघाटी करण्यात आले असता संबंधीत निविदाधारक यांनी विषयांकित काम चालू दरसूचीच्या ९.९९% जादा म्हणजेच अंदाजीत किंमतीच्या ३३.१६ % जादा म्हणजेच रू.६८,९५,०८६/- या दराने करणेबाबत तयारी दर्शवून त्याबाबतचे लेखी पत्र दिलेले आहे.

यास्तव विषयांकित कामीचे निविदाधारक मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटी नुसार कमी करून सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार काम करणेची तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे दर आलेले आहेत.

| | |
|---|---|
| **CSR cost (सन 2013-2014)** | R.s. 62,68,830/- |
| **Estimated cost** | R.s. 51,77,930/- |
| **वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार 33.16% Above Estimeted Cost** | R.s. 68,95,086/- |

Negociated offer to be acceptable R.s. 62,68,830.00x9.99%= **R.s. 68,95,086/-**

करिता

मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३३.१६% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रूपये ६८,९५,०८६/- च्या निविदेस मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मा मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. छाननी समिती, शाखा अभियंता व पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार कार्यवाहीचे आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालानुसार मा. स्थायी समितीकडे मंजूरीकरिता सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-_शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर वॉश, ओव्हर फ्लो इत्यादीचे वाया जाणारे पाणी पुर्नउपयोगात आणणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- वाया जाणारे पाणी पुर्नवापरात आणणे म्हणजे पाण्याची बचत करणे आहे.आज लाखो लिटर पाणी या वॉश आउट करीता वाया जात आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- किती वर्षांपासून सदरचे पाणी वाया जात आहे.

मा.श्री निकम,मेकॅनिकल इंजि. :- सन १९९९ पासून पाणी वाया जात आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- १४ वर्ष प्रशासन काही का करीत नाही.

मा.श्री.निकम.मेकॅ.इंजी. :- वाया जाणारे पाणी पुर्नवापरात आणणे करीता यापुर्वी मागील मार्च मध्ये सदर कामाबाबत निविदा मंजूर करून कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदरचे काम आरडे इलेक्ट्रीकल्स यांनी घेतले होते. वर्क ऑर्डर झाल्यानंतर सदर दराने काम करण्यास आम्हाला परवडत नसल्याने दर वाढ करून काम देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली. दर वाढ देता येत नसलयाने काम दिले नाही. सदर कामाची पुन्हा निविदा काढल्यानंतर एस.आर.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आलेली आहे. आरडे इलेक्ट्रकल्स यांना अनामत रक्कम दिलेली नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :- एस.आर. कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कामाची माहिती देण्यात यावी.

मा.श्री.निकम, मेकॅ. इंजी. :- एस.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत संस्था आहे. जीवन प्राधिकरणाकडे त्यांची कामे चालू आहेत.

मा.श्री.दीप चव्हाण :- एस.आर.कन्स्ट्रक्शन कंपनी यांना कमाचा अनुभव कमी आहे. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये अनुभवाचा उल्लेख नाही. काम अपूर्ण सोडले तर काय करणार.

मा.श्री.निकम मेकॅ.इंजी. :- निविदा छाननी समितीने सर्व कागदपत्रांची छाननी केली आहे.

मा.सभापती साहेब :- जलशुध्दीकरणाबाबत माहिती सांगावी.

मा.श्री.निकम मेकॅ.इंजी. :- जलशुध्दीकरण केंद्रावर १० पंप सतत चालू राहणे आवश्यक आहे. १० पंप चालले तरच शहराला पुरेसा पाणि पुरवठा होउ शकतो. दररोज एक फिल्टर साफ करणे आवश्यक असते.त्यातील पाणी सध्या ओढयाला सोडावे लागते ते वाया जाते.सदर वाया जाणारे पाणी वापरात आणणे करीता जमीनीखाली भुमीगत एक टाकी बांधून त्यामध्ये फिल्टरचे पाणी साठवून त्याचा पुर्नवापर करावयाचा आहे. त्यासाठी पाण्याची टाकी,पंप, पाण्याची लाईन टाकावी लागाणार आहे.त्यासाठी जादा कामाच्या अनुभवाची आवश्यकता भासणार नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजना हस्तांतरण होतेवेळी किती कर्मचारी तत्कालीन कर्मचारी वर्ग करण्यात आले. त्यापैकी आज किती कार्यरत आहेत.

मा.श्री.निकम मेकॅ.इंजी. :- सदर योजना हस्तांतर होतेवेळी १११ कर्मचारी हस्तांतरीत झालेले आहेत. त्यापैकी बरेचसे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत.पर्यायाने कर्मचारी संख्या कमी झालेली आहे.

मा.श्री.दीप चव्हाण - पाणीपुरवठयाकडे कर्मचारी देण्याची कार्यवाही करण्यात यावी. १० फिल्टर व पंप चालू रोज चालू राहतील याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट प्रमाणे प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट प्रमाणे प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर वॉश, ओव्हर फ्लो इत्यादीचे वाया जाणारे पाणी पुर्नउपयोगात आणणे अंतर्गत निविदा ई- निविदा क्रमांक ७२९ करिता प्राप्त झालेली मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची निविदा व त्यांचेशी वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३३.१६% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रूपये ६८,९५,०८६/- च्या निविदेस मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२

विषय क्रमांक- १४४ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता मालाचे वार्षिक दर करार करणेसाठी मालाचे संपूर्ण तपशील व परिमाणासह माहिती मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

विनंती रिपोर्ट की, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस इलेक्ट्रीक साहित्य उदा.४० वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर,चोक,टयुब पट्टी, १५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर,कॉपर केबल,वायर,फॅन,मोटर पंप,मेनस्वीच स्टार्टर,फ्युज, यु.पी.एस, टयुबलर बॅटरी इ.साहीत्य पुरवण्यासाठी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस तसेच जाहिर टेंडर नोटीस मुदतवाढ प्रथम वेळ व दुसरी वेळ प्रसिध्द करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)अर्हम एंटरप्राईज,मुंबई.
२)दि.न्युट्रॉन इलेक्ट्रिकल्स,मुंबई.
३)कला इलेक्ट्रिक स्टोअर,मुंबई.

यापमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे)लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -

अ.क्र.-१ ते ७९ चे दर मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

अ.क्र.-१ ते ७९ चे साहित्याचे DSR दर नमुद करणेसाठी निविदा दराचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.स्टोअर विभाग - १९२ दि.१८/११/२०१४ अन्वये मा.इलेक्ट्रिक विभाग प्रमुख,अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस पाठविला असता त्यांनी निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.९ मध्ये सन २०१३-१४ चे दरसुचीतील उपलब्ध दर नमुद करुन सदरचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.इलेक्ट्रिक विभाग - ४३४ दि.१२/०१/२०१५ अन्वये स्टोअर विभागाकडे पाठविलेला आहे.

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता -

अ.क्र.- २,८,२२,५७,६१ ते ६२,६६ ते ७९ चे DSR दर उपलब्ध नाहीत परंतु इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांनी मंजुरी करणेबाबतचा अभिप्रेत दर नमुद करुन दिलेला आहे.

अ.क्र.- ५ चे निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे प्राप्त दर व DSR दर समान आहेत.

अ.क्र.- १,४,७,१२ ते १३,१५,१७,२३,५८,६३,६५ चे दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

अ.क्र.- ३,६,९ ते ११,१४,१६,१८ ते २१,२४ ते ५६,५९ ते ६०,६४ चे दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे निविदादर धारक अर्हम एंन्टरप्राईज,मंबई यांना जा.क्र.स्टोअर विभाग - २७४ दि.३१/०१/२०१५ अन्वये मंगळवार दि.०३/०२/२०१५ रोजी निविदा दर वाटाघाटीसाठी मा.प्रशासकिय निविदा छाननी समिती बैठकीत समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित होते.सदर वेळी झालेल्या चर्चेत -

अ.क्र.१,४,७,१२ ते १३,१५,१७,२३,५८,६३ व ६५ (एकुण ११ (अकरा) प्रकारचे इलेक्ट्रिक साहित्याचे दर सन २०१३-१४ करिताच्या मंजूर DSR दराशी तुलना करता स्पर्धात्मकदृष्टया कमी असल्याने व अ.नं. ५ चा दर समान असल्याने निविदेत दिलेले स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दर मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.३,६ ,९ ते ११,१४,१६,१८ ते २१,२४ ते ५६,६० व ६४ चे (एकूण ४६ (शेहेच्याळीस) प्रकारचे इलेक्ट्रिक साहित्य सन २०१३-२०१४ चे मंजुर DSR दरा प्रमाणे मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.२,८,२२,५७,६१ ते ६२,६६ ते ७९ चे (एकूण २० (बीस) प्रकारचे इलेक्ट्रिक साहित्याचे DSR दर उपलब्ध नसल्याने इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांनी मंजुरी करणेबाबत शिफारस केलेल्यासन २०१२-१३ करिताच्या वार्षिक मंजूर निविदा दरा प्रमाणे मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.५९-२४ वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक कंपनी क्रॉम्प्टनचा निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दर रु.४५०/- फक्त प्रती १ नग व DSR दर रु.२१४/- प्रती १ नग असून निविदादर धारक यांनी DSR दराप्रमाणे पुरवठा करण्याचे अमान्य केले.म्हणून उत्पादक कंपनी - क्रॉम्प्टन ग्रीव्हज लिमिटेड.,मंबई यांचेकडे दुरध्वनीद्वारे समक्ष चौकशी करुन ई-मेल द्वारे कोटेशन दरपत्रक मागविले असता प्राप्त कोटेशन दरपत्रकात रु.३०३/- + १२.५% Vat असे एकूण रु.३४०/- प्रती १ नग याप्रमाणे दर मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

निविदा दर धारक अर्हम एंन्टरप्राईज,मुंबई यांनी निविदेतील तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रातील पत्रान्वये जकात व स्थानिक संस्था कर(L.B.T.)माफीचे प्रमाणपत्र दयावे लागेल अन्यथा जकात व स्थानिक संस्था कर(L.B.T.) वेगळा आकारला जाईल असे नमुद केलेले असल्याने निविदाकार यांचे मागणी प्रमाणे त्यांना जकात अथवा स्थानिक संस्था कर(L.B.T.) माफीचे प्रमाणपत्र देणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे निविदादर धारक अर्हम एंन्टरप्राईज,मुंबई यांनी मान्य करुन तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

प्राप्त निविदा दरातील वाटाघाटी अंती मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने संबंधित निविदाकार यांचे मंजुरीबाबत शिफारस केलेले दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.११ मध्ये नमुद करण्यात आलेले असून सदरचे दरास तसेच निविदाकार यांचे मागणीप्रमाणे त्यांना जकात अथवा स्थानिक संस्था कर(L.B.T.) माफीचे प्रमाणपत्र देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय निविदा छानणी समिती मार्फत करण्याचे ठरले आहे.

मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीच्या शिफारसी प्रमाणे (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.११ मधील ) नमुद दरास तसेच निविदाकार यांचे मागणीप्रमाणे त्यांना जकात अथवा स्थानिक संस्था कर(L.B.T.) माफीचे प्रमाणपत्र देणेस मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.०४/०२/२०१५ चे प्रस्तावावर मा.इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांनी "मा.प्रशासकिय निविदा समितीच्या शिफारसीप्रमाणे निविदा दर मंजुर करण्यास हरकत नाही आदेशार्थ सादर "

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "स्टोअर लिपिक,स्टोअर प्रमुख व इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांच्या शिफारशी नुसार "A" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही"

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "यथाप्रस्तावित नुसार 'अ' प्रमाणे कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर"

मा.आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त सविस्तर अहवालानुसार निर्णया करिता स्थायी समितीकडे सादर" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे निविदाकार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेले(निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.११ मध्ये नमुद) वार्षिक निविदा दरास तसेच निविदाकार यांचे मागणीप्रमाणे त्यांना जकात अथवा स्थानिक संस्था कर (L.B.T.)माफीचे प्रमाणपत्र देणेस मंजुरी मिळावी हि विनंती.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**<u>सोबत -</u>** संबंधित निविदाकार यांची विदयुत साहित्याची दराची यादी

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे

**निविदाकार - अर्हम एंटरप्राईज, ५०६,पदम अपार्टमेंन्ट,सर्वोदय नगर,मुलूंड(पश्चिम), मुंबई - ४०० ०८०.**

| अनं. | मालाचा तपशील | परिमाण | निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम निविदा दर रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ४ फ़ुट ४० वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ४७=२५ |
| २ | ट्युब लॉक होल्डर (ब्रॉस कॉन्टॅक्ट)<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १०=८० |
| ३ | ४० वॅट ट्युब स्टार्टर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ११=०० |
| ४ | ४ फ़ुट ट्युब पट्टी चोक स्टार्टरसह कप्लींट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ३८४=०० |
| ५ | १५० वॅट सोडीयम बल्ब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ५७९=०० |
| ६ | १५० वॅट सोडीयम चोक<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ८७०=०० |
| ७ | १५०/२५० वॅट सोडीयम इग्नेटर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो/बजाज | प्रती १ नग | २४०=०० |
| ८ | १५० वॅ्ट मर्क्युरी थ्रेड टाईप होल्डर | प्रती १ नग | ८८=०० |
| ९ | सिलिंग फ़ॅन ५६" संपूर्ण असेसरीजसह<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | १८४०=०० |
| १० | पेडस्टल फ़ॅन १६"<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | २४५५=०० |
| ११ | टेबल फ़ॅन<br>उषा /क्रॅाम्प्टन | प्रती १ नग | १७८७=०० |
| १२ | ४ फ़ुट ४० वॅट स्ट्रीट लाईट फ़िंटीग<br>कप्लीट ट्युबसह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १३६०=०० |
| १३ | १५० वॅ्ट सोडीयम व्हेपर कप्लीट फ़िटीग बल्बसह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ३९६०=०० |
| १४ | जी.आय तार नं. १४ | प्रती १ किलो | ९७=०० |
| १५ | फ़ायबर ड्युम हंडी १२ " फ़ायबर प्लास्ट | प्रती १ नग | ७८६=०० |
| १६ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर १.५ टनक्षमता व्होल्टेज स्टॅबीलायझरसह<br>एल.जी / ब्ल्यु स्टार /पॅनासॉनिक | प्रती १ नग | ५०५८२=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर २ टन क्षमता<br>व्होल्टेज स्टॅबीलायझर<br>एल.जी / ब्ल्यु स्टार/पॅनासॉनिक | प्रती १ नग | ६९३००=०० |
| १८ | सी.एफ़.एल. १८ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | २०३=०० |
| १९ | सी.एफ़.एल.११ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १४४=०० |
| २० | लोखंडी ब्रॉकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ३ फ़ुट २५ MM | प्रती १ नग | ३९५=०० |
| २१ | लोखंडी ब्रॉकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ५ फ़ुट ४० MM | प्रती १ नग | ५१४=०० |
| २२ | लोखडी क्लॅम्प<br>५" X ३" नटबोल्ट सह | प्रती १ नग | २५९=०० |
| २३ | २.५ एम एम २ कोअर सर्व्हिस वायर<br>३०० फ़ुट - ISI मार्क<br>नामांकित कंपनी | प्रती १ बंडल | १६२०=०० |
| २४ | १ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | ९७५=०० |
| २५ | २.५ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | २२००=०० |
| २६ | ४ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | ३२००=०० |
| २७ | पी.एल.३६ वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १८६=०० |
| २८ | पी.एल. २४ वॅट टयुब<br>क्रॉम्प्टन / फिलिप्स / विप्रो | | १४२=०० |
| २९ | १ एच.पी.सबमर्शीबल सिंगल फ़ेज मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर | प्रती १ नग | १३९०४=०० |
| ३० | ५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २८४१३=०० |
| ३१ | ७.५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २८७०४=०० |
| ३२ | १० एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी<br>/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३५३०७=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | ५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २५२५४=०० |
| ३४ | ७.५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन/टेक्स्मो/लुबी<br>/बीबीसी/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २८६४८=०० |
| ३५ | १० एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी<br>/किर्लोस्कर/विप्रो | प्रती १ नग | ३५३०७=०० |
| ३६ | १५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी<br>/बीबीसी/किर्लोस्कर/विप्रो/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ५०६२३=०० |
| ३७ | ५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १८४५=०० |
| ३८ | ७.५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १८४५=०० |
| ३९ | १० एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | २८७७=०० |
| ४० | १५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | ६९०५=०० |
| ४१ | ४ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर कॉपर<br>सबमर्शीबल केबल.<br>ISI मार्क | प्रती १ मिटर | १३८=०० |
| ४२ | २.५ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर<br>कॉपर केबल. ISI मार्क | प्रती १ मिटर | ९२=०० |
| ४३ | मेन स्वीच थ्री फ़ेज ६३ A<br>स्टेनले कंपनी /नामांकित कंपनी | प्रती १ नग | २६८५=०० |
| ४४ | १०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ५६३०=०० |
| ४५ | २०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ७१६४=०० |
| ४६ | ३२ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | १४३=०० |
| ४७ | ६३ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३१२=०० |
| ४८ | १०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ७१९=०० |
| ४९ | २०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | १२२८=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | ७०० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ७१८६=०० |
| ५१ | ९०० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ८२२७=०० |
| ५२ | ९०० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ८२२७=०० |
| ५३ | १६०० व्ही.ए.यु.पी.एस. २४ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ११४४५=०० |
| ५४ | १५० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी - मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /ओकाया / एक्साईड. | प्रती १ नग | १६१४१=०० |
| ५५ | २०० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी - मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /ओकाया / एक्साईड. | प्रती १ नग | २०६१९=०० |
| ५६ | T- ५ २८ वॅट ४ फ़ुटी ट्युब<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १३४=०० |
| ५७ | डी.ओ.फ़्युज लिंक ३३ के.व्ही. | प्रती १ नग | ५३=९०<br>५ to १० / AMP<br>१३२=३०<br>१६ to ६३ /AMP |
| ५८ | ४० वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | २८०=०० |
| ५९ | २४ वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | | ३४०=०० |
| ६० | १५० वॅट डबल एन्डेड मेटल हॅलाईड ट्युब<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | ७१९=०० |
| ६१ | रबर हॅण्डग्लोज ३३००० व्होल्ट<br>३३ के.व्ही. | प्रती १ जोड | ७१९=०० |
| ६२ | टेप बंडल १० मीटर<br>ॲकर /स्टील ग्रिप | प्रती १ नग | ११=२५ |
| ६३ | ४०० वॅट मेटल हॅलाईड ट्युब<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | ११८५=०० |
| ६४ | ४०० वॅट मेटल हॅलाईड चोक<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | २३०४=०० |
| ६५ | ४ x ३६ एनर्जी सेव्हींग फिटींग<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | | ३९८५=०० |
| ६६ | १०० AMP कॉपर फ्युज वायर | प्रती १ किलो | १२९६=०० |
| ६७ | टपारिया टेस्टर ८१३ | प्रती १ नग | ४५=०० |
| ६८ | टपारिया पक्कड इले. १६२७/८ | प्रती १ नग | २०२=५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२५ | प्रती १ नग | ५६=७० |
| ७० | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२४ | प्रती १ नग | ५४=०० |
| ७१ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८८३५ | प्रती १ नग | ४५=०० |
| ७२ | टपारिया क्रॉसपीन हॅमर १/२ kg | प्रती १ नग | २२६=८० |
| ७२ | टपारिया स्पॅनर सेट | प्रती १ सेट | २४७=५० / १८०८ मॉडेल नंबर ६४८=०० / १८०१० मॉडेल नंबर |
| ७४ | ड्रिल मशिन ब्लॅक ॲण्ड डेकर मेक १२mm | प्रती १ नग | २५७५=८० |
| ७५ | इन्डस्ट्रियल सेफ्टि इलेक्ट्रिक हॅण्ड ग्लोव्हज | प्रती १ जोड | ६०७=५० / ११०० V |
| ७६ | टॉंग टेस्टर ६५० AMP | प्रती १ नग | २७५४=०० |
| ७७ | इव्हररेडी एल.ए.डी.बॅटरी | प्रती १ नग | २९७=०० |
| ७८ | इलेक्ट्रिक बेल / रेमोट बेल | प्रती १ नग | १०४=५० / इलेक्ट्रिक बेल ५०७=१० / रिमोट बेल |
| ७९ | लेदर सेफ्टि शूज विथ स्टील टो | प्रती १ जोड | ६०७=५० /Concow ६ to १० |

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता मालाचे वार्षिक दर करार करणेसाठी मालाचे संपूर्ण तपशील व परिमाणासह माहिती मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दीप चव्हाण :- इलेक्ट्रीक विभागाकडे कोणत्याही साहित्याची मागणी केली असता वेळेवर साहित्य उपलब्ध होत नाही. मी मागील ६महिन्यांपासून इलेक्ट्रीक टयुब फिटींगची मागणी करीत आहे. अद्याप पर्यंत मला मिळालेले नाहीत.

मा. श्री.सावळे,इले.विभाग :- चव्हाण साहेबांची ३महिन्यांपासून इलेक्ट्रीक फिटींगची मागणी आहे परंतू साहित्य उपलब्ध नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- मी अनेक दिवसांपासून बोल्हेगाव परिसराकरीता कॉपर वायरची मागणी केली आहे.साहित्य देण्याबाबत वेळोवेळी टाळाटाळ केली जाते.

मा.श्री.संपत बारस्कर :- सावेडी विभागात वेळोवेळी मागणी करून इतर साहित्य तर नाही पण साधे बल्बही दिले जात नाही.

मा.श्री.भालचंद्र बेहेरे,उपायुक्त कर :- स्टोअर विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार टयुब फिटींग बल्ब,चोक,स्टार्टर वायर बंडल शिल्लक असल्याचे दाखवले जात आहे.उपलब्ध साहित्य मागणीनुसार नगरसेवकांना वाटप करण्यास काही हरकत नाही.

मा.सभापती साहेब :- हे इलेक्ट्रीक साहित्य कोणत्या वर्षा करीता खरेदी करायचा दर आहे.

इले. सुप. श्री. सावळे :- सन २०१४-१५ करीता.

मा.श्री.अजिंक्य बोरकर:- सन २०१४-१५ संपायला किती काळराहीला आहे.

इले. सुप. श्री. सावळे :- १ दिवस

मा.सभापती साहेब :- सन२०१५-१६ करीता पुन्हा दर मागवीणार का?त्याची इले. साहित्य कधी खरेदी करणार नाहीतर त्याला पुढच्या वर्षाचा शेवट होईल. प्रभागामध्ये पुरविण्याचे काय करणार.

इले. सुप. श्री. सावळे :- हा प्रस्ताव सन २०१४-१५ करीता आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर:- ऑफिस रिपोर्ट मध्ये प्रस्तावीत केलेले दर सन २०१४-१५ करिता असले तरी पुढील वर्षी पुन्हा नव्याने दर मंजूर करणे मध्ये वेळ जावू नये आणि नागरिकांची गैरसोय होव ू नये म्हणून पुढील वर्षी करीता हेच दर मंजूर करून प्रस्तावीत इलेक्ट्रीक साहित्य खरेदी करावे.विषय मंजूर करा.

मा.श्री.संपत बारस्कर :- वर्ष संपण्यास एक दिवस राहिल्याने पुढील वर्षा करिता याच दराने खरेदी करावी.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणे रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या पुरवठादाराकडून इलेक्ट्रीक साहित्य घेण्यास मान्यता द्यावी. आणी रिपोर्ट मधील अटी मान्य कराव्यात. विषय सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद मालाचे वार्षिक दर करार करणेसाठी आलेल्या कमीचे दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. तसेच पुढील आर्थीक वर्षा करीता रिपोर्ट मध्ये नमूद साहित्य याच दराने खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफीस रिपोर्ट मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे LBT बाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. विषय सर्वानुमते मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमादेक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४५ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत केडगाव भागासाठी नव्याने टाकणेत आलेल्या जलवाहिनीवरून नळ जोडणे करिता सर्व साहित्य, खोदाई, जोडाई बुजाई व टेस्टींग करणे इत्यादीसह मागविणे अंतर्गत फेर जाहिर निविदा क्र. २ करिता प्राप्त झालेली मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग

संदर्भ- १. दि.१३/०१/२०१५ रोजीची छाननी समिती

२. मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांचे दि.२३/०२/२०१५ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा. छाननी समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १६/१२/२०१४ रोजी खालील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांचा आर्थिक दरांचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत आला असून प्राप्त झालेल्या एकच निविदे बाबत तक्ता खालील प्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

**कामाचे नाव-** UIDSSMT योजने अंतर्गत केडगाव भागासाठी नव्याने टाकणेत आलेल्या जलवाहिनीवरून नळ जोडणे करिता सर्व साहित्य, खोदाई , जोडाई बुजाई व टेस्टींग करणे

**अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,४७,४५,४२१/-**

प्राप्त झालेल्या निविदेच्या दराचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर. | १००.०० % जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेले मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन , अहमदनगर यांचा देकार अंदाजपत्रकीय निविदा रकमेच्या १००% जादा म्हणजेच रू.२,९४,९०,८४२/- इतके आलेले आहेत.

परंतू ठेकेदाराने विषयांकित निविदेमध्ये नमूद केलेले दर हे अत्यंत अवाजवी वाटत असल्याने त्यांना दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटीसाठी दि.१३/१/२०१५ रोजी मा.उपायुक्त (सा.) यांचेकडे निविदा छाननी समितीपुढे बोलावून घेवून दराबाबत वाटाघाटी करण्यात आले असता सद्यस्थितीत मार्केटमध्ये जोडणीसाठी लागणारे मटेरियल तसेच मजूरीचा विचार करता दरामध्ये बरीच तफावत असल्याने दर कमी करणे शक्य नसल्याचे मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन यांनी सांगितले. त्यामुळे त्यांनी निविदे बाबत निर्णय घेणेसाठी, कामाचे Evaluation व Rate analysis करणेसाठी चार दिवसाची मुदत मिळणेची लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. त्यानुसार संबंधीत ठेकेदार यांना सदर निविदे बाबत अंतीम दर त्वरीत सादर करणे बाबत पा.पु. पत्र क्र.१२०५ दि.२३/०१/२०१५ व पा.पु.पत्र क्र.१३०५ दि.१८/०२/२०१५ अन्वये कळविण्यांत आले होते. या अनुषंगाने मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांनी दि.२३/०२/२०१५ अन्वये लेखी संमती दिलेली आहे.

सदर पत्रात संबंधीत निविदाधारक यांनी दि.१३/०१/२०१५ रोजी झालेल्या छाननी समितीतील बैठकीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे विषयांकित काम चालू किंमतीच्या (दरसुची २०१३-२०१४ ) च्या ९.९९% जादा म्हणजेच अंदाजित किंमतीच्या ९.९९% जादा म्हणजेच रू.१,६२,१८,४८९/- या किंमतीस करणेबाबत तयारी दर्शवून त्याबाबतचे लेखी पत्र दिलेले आहे.

यास्तव विषयांकित कामीचे निविदाधारक मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटी नुसार कमी करून सन २०१३-२०१४ चे दरसुची पेक्षा ९.९९% जादा दराने काम करणेची तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे दर आलेले आहेत.

| | |
|---|---|
| **चालू दरसूची सन २०१३-२०१४ नुसार किंमत** | **रू. १,४७,४५,४२१/-** |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | **रू. १,४७,४५,४२१/-** |
| **वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार** | |
| **चालू दरसुचीच्या ९.९९% जादा** | **रू.१,६२,१८,४८९/-** |

करीता

मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचेशी छाननी समितीचे बैठकीमध्ये झालेल्या चर्चा / निर्णयानुसार वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ९.९९% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रू.१,६२,१८,४८९/- च्या निविदेस मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता पा.पु.वि. यांचा अहवाल असे.

यावर मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मा.छाननी समिती , शहर पाणी पुरवठा विभाग प्रमुख व शाखा अभियंता यांचे शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-_यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत केडगाव भागासाठी नव्याने टाकणेत आलेल्या जलवाहिनीवरून नळ जोडणे करिता सर्व साहित्य, खोदाई, जोडाई बुजाई व टेस्टींग करणे इत्यादीसह करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दीप चव्हाण :- केडगाव भागासाठी नव्याने टाकण्यात आलेल्या जलवाहिनीवरून नवीन नळजोड देण्याबाबत सर्वसाधारण सभेचा ठराव झालेला आहे.

मा.श्री.निकम, मेकॅ.इंजी. :- ठरावानुसार देण्यात येणारे नळ जोड हे समप्रमाणात असणे आवश्यक आहे. संबंधीत निविदाधारक यांचेकडे अनुभवी इंजीनियर्स आहेत. त्यांच्या देखरेखीखाली हे काम चांगले होईल. नळ जोड देतान प्रत्येक ग्राहकाकडून एकुण रकमेच्या ५०टक्के रक्कम रोख स्वरूपात व उर्वरीत ५० टकके रक्कम पाणीपट्टी बिलात वसूल केली जाईल.

मा.श्री.दीप चव्हाण :- एकूण खर्च किती आहे.

मा.श्री.निकम, मेकॅ.इंजी. :- ज्या रस्त्याच्या बाजूने पाईपलाईन गेलेली आहे त्या बाजूने नळ जोड द्यायचा असल्यास प्रती कनेक्शन रू.२०८३ व रस्त्याच्या विरूध्द बाजूस कनेक्शन द्यावयाचे असल्यास रू.२७७५ इतका खर्च येणार आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- नागरीकांकडून एवढे पैसे का घेता.

मा.सौ.सुनिता कांबळे :- ठेकेदाराने काम करतांना विना परवाना नळ कने. दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार व नळ कनेक्शन धारकांवर ठेवा. तरी सदर कामास तात्काळ मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.निकम,मेकॅ.इंजी :- महानगरपालिकेच्या महासभेत झालेल्या निर्णयानुसार धोरण ठरले आहे.

मा.सौ.सुनिता कांबळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.श्री. कुमार वाकळै :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत केडगाव भागासाठी नव्याने टाकणेत आलेल्या जलवाहिनीवरून नळ जोडणे करिता सर्व साहित्य, खोदाई, जोडाई बुजाई व टेस्टींग करणे इत्यादीसह मागविणे अंतर्गत फेर जाहिर निविदा क्र. २ करिता प्राप्त झालेली मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची निविदा व वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ९.९९% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रू.१,६२,१८,४८९/- च्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४६ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत इंदिरानगर, ताराबाग कॉलनी , श्रीराम कॉलनी अंतर्गत डी.आय. व HDPE वितरण व्यवस्था पुरवठा करणे, अथंरणे, जोडणे व चाचणी देणे इत्यादी करणे अंतर्गत निविदा ई - निविदा क्र.७२५ करिता प्राप्त झालेली मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ :- १. दि.१३/०१/२०१५ रोजीची छाननी समिती

२. मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन यांचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे दर वाटाघाटी विषयाचे पत्र प्राप्त दि.१८/०२/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १६/१२/२०१४ रोजी खालील कामासाठी प्राप्त झालेल्या ई - निविदांचा आर्थिक दरांचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत आला असून संगणकीय ई निविदा रिझर्ल्ट तक्त्याचे अवलोकन करून त्यामध्ये प्राप्त झालेल्या एकच निविदेबाबत तक्ता खालील प्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

**ई - निविदा क्र.७२५-** अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव पाणीपुरवठा योजनेंअतर्गत इंदिरानगर , ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी अंतर्गत डी.आय. व HDPE वितरण व्यवस्था पुरवठा करणे , अंथरणे, जोडणे व चाचणी देणे इत्यादी करणे

**अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,७८,३०,८८७/-**

**प्राप्त झालेल्या निविदेच्या दराचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर. | ६०.०० % जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने ई-निविदा क्र.७२५करीता प्राप्त झालेले मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन , अहमदनगर यांचा देकार अंदाजपत्रकीय निविदा रकमेच्या ६०.००% जादा म्हणजेच रू. ४,४५,२९,४१९/- इतके आलेले आहेत.

परंतू ठेकेदाराने विषयांकित निविदेमध्ये नमूद केलेले दर हे अत्यंत अवाजवी वाटत असल्याने त्यांना दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटीसाठी दि.१३/१/२०१५ रोजी मा.उपायुक्त (सा.) यांचेकडे निविदा छाननी समितीपुढे बोलावून घेवून दराबाबत वाटाघाटी करण्यात आले असता निविदेतील सर्व बाबीचे दर वाढलेले असून अंदाजपत्रकीय दराने करणे शक्य नसल्याचे मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन यांनी सांगितले. तसेच संबंधीत एजन्सीने सन २०१३-२०१४ च्या जिल्हा चालू दरसुची पेक्षा बाजारातील दर यामध्ये मोठया प्रमाणात तफावत आहे. त्यामुळे त्यांनी निविदेबाबत निर्णय घेणेसाठी, कामाचे Evaluation व Rate analysis करणेसाठी चार दिवसाची मुदत मिळणेची लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. त्यानुसार संबंधीत ठेकेदार यांना सदर निविदे बाबत अंतीम दर त्वरीत सादर करणे बाबत दि.२३/०१/२०१५अन्वये कळविण्यांत आले होते. या अनुषंगाने मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांचे दि.३०/०१/२०१५ चे पत्र दि.१८/०२/२०१५ रोजी प्राप्त झालेले आहे.

सदर पत्रात संबंधीत निविदाधारक यांनी दि.१३/०१/२०१५ रोजी झालेल्या छाननी समितीतील बैठकीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे विषयांकित काम चालू किंमतीच्या (दरसुची २०१३-२०१४ ) च्या ९.९९% जादा म्हणजेच अंदाजित किंमतीच्या १९.७२% जादा म्हणजेच रू. ३,३३,१८,७८१/- या दराने करणेबाबत तयारी दर्शवून त्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

यास्तव विषयांकित कामीचे निविदाधारक मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटी नुसार कमी करून सन २०१३-२०१४ चे दरसुची पेक्षा ९.९९% जादा दराने काम करणेची तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे दर आलेले आहेत.

| | |
|---|---|
| **चालू दरसूची सन २०१३-२०१४ नुसार किंमत** | **रू. ३,०२,९२,५५५/-** |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | **रू. २,७८,३०,८८७/-** |
| **वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार** | |
| **चालू दरसुचीच्या ९.९९% जादा** | **रू. ३,३३,१८,७८१/-** |

करीता

मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचेशी छाननी समितीचे बैठकीमध्ये झालेल्या चर्चा / निर्णयानुसार वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १९.७२% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रू. ३,३३,१८,७८१/- च्या निविदेस मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता पा.पु.वि. यांचा अहवाल असे.

यावर मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मा.छाननी समिती , शहर पाणी पुरवठा विभाग प्रमुख व शाखा अभियंता यांचे शिफारशीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत इंदिरानगर, ताराबाग कॉलनी , श्रीराम कॉलनी अंतर्गत डी.आय. व HDPE वितरण व्यवस्था पुरवठा करणे, अथंरणे, जोडणे व चाचणी देणे इत्यादी करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.सुनिता कांबळे:- सदर कामास तात्काळ मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सुनिता कांबळे:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत इंदिरानगर, ताराबाग कॉलनी , श्रीराम कॉलनी अंतर्गत डी.आय. व HDPE वितरण व्यवस्था पुरवठा करणे, अथंरणे, जोडणे व चाचणी देणे इत्यादी करणे अंतर्गत निविदा ई - निविदा क्र.७२५ करिता प्राप्त झालेली मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन ,अहमदनगर यांची निविदा व वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १९.७२% जादा (सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार ९.९९% जादा) म्हणजेच रू. ३,३३,१८,७८१/- च्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४७ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहामहिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेकरीता पुर्व मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- १. डॉ. सुरेश विलास घोलप यांचा दिनांक ०८/०१/२०१५ रोजीचा अर्ज

२. मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ९५० दिनांक ७/२/२०१५ अन्वयेच्या प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, डॉ. सुरेश विलास घोलप यांनी दिनांक ०८/०१/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्यावर वैद्यकीय अधिकारी म्हणून सहा महिन्याकरीता पुर्नेनेमणूक करण्यात यावी." असे नमुद करून विनंती अर्ज केलेला आहे.

तसेच मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ९५० दि.७/२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने अहमदनगर शहरामध्ये फिरता दवाखाना सुरू करण्यात आलेला आहे. सदर फिरत्या दवाखान्यामुळे दारिद्रय रेषेखालील व गलीच्छ वस्तीत जाउन आरोग्य बाबत जागृती व नागरिकांना आरोग्य सेवा पुरवली जाते. सदरच्या फिरत्या दवाखान्याकरिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची जा.नं.आस्था./ कंत्राटी करार नेमणूक ३६४८ दि.१३/८/२०१४ अन्वये सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली होती. सदर आदेशाची मुदत दि.१४/०२/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांनी संदर्भ क्र.२ नुसार पुढील सहा महिन्याकरीता पुनर्नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. तसेच त्यांनी आतापर्यत केलेल्या कामाचा तपशिल सोबत जोडुन दिलेला आहे. अहमदनगर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिका-यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे फिरत्या दखाखान्याकरीता वैद्यकीय अधिका-याची आवश्यकता आहे. वरील कालावधीत व याआधी दिलेल्या नेमणूकीच्या कालावधीत डॉ. सुरेश विलास घोलप यांचे काम समाधानकारक आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.१६/२/२०१५ ते १६/८/२०१५ अखेर पुननेमणूक देणेस शिफारस आहे." असे नमुद करून निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह ७८ दि.२०/१२/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डॉ. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६६८२ दि.२०/१/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.१८/१/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता रूपये २०,०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्कशीट १७१ दि.२९/१/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र. १९ दि.८/७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ६६८२ दि.२०/०१/२०१४ अन्वये दिनांक १८/१/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २०,०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यांत आलेल्या या कार्योत्तर मंजुरीचा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रिक खंड देउन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाद्वारे मंजुरी देण्यांत येत आहे. या प्रक्रियेमधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव सहा महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरू करावी व ज्या पदांवर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत, त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सद्यस्थितीमध्ये डॉ.सुरेश विलास घोलप यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.१९दि.८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ३६४८दि.१३/८/२०१४ अन्वये फिरता दवाखान्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवुन दि.१४/८/२०१४ पासुन सहा महिन्याकरिता रू.२०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबंधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही दिनांक १३/०२/२०१५ रोजी समाप्त झालेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये फिरता दवाखान्याकरीता वैद्यकीय अधिकारी हे पद मंजूर नाही.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१९ दि.८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावामध्ये सहा महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरू करावी असे नमुद केलेले आहे.

तथापि फिरता दवाखान्याकरीता वैद्यकीय अधिकारी हे मंजूर नसल्यामुळे वैद्यकीय अधिकारी या पदांवर पदोन्नती अथवा सरळसेवेने भरती बाबतची कार्यवाही करता येणे अशक्य आहे.

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणेकरीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यांत आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

**५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र, कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कालम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही  कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रूपयाहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमूद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेया फिरत्या दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये वैद्यकीय अधिकरी हे पद मंजूर नसल्यामुळे शहरामधील दारिद्रय रेषेखालील व गलीच्छ वस्तीत जाउन नागरिकांना आरोग्य सेवा तातडीने देणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. मा.प्र.मुख वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचेकडील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतीका गृह जा.क्र.९५० दिनांक ७/२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समिती पुर्व मंजुरीने फिरत्या दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे दिनांक १६/२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता  करारानुसार  रू.२००००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रू.२००००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे. दवा. यांचेकडील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतीका गृह जा.क्र. ९५० दिनांक ७/२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुंषगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय  अधिकारी या पदांवर डॉ. सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक १६/२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता रूपये २००००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सन २०१४-२०१५
अंदाजपत्रकीय तरतुद
लेखाशिर्ष मानधन (ऑनररी डॉक्टर)
एकुण तरतुद रू.३४,३२,०००/-
झालेला खर्च रू. २९,०९,३५४/-
--------------------------------
शिल्लक तरतुद रू. ५,२२,६४६/-

यावर मा.प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मा.मु.ले.अ.व मा.मु.ले.प. यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मु.ले.अ. यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मु.ले.प. यांचा अभिप्राय की, दि.३/२/२०१५ रोजी विभागाच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरीनुसार मे.स्थायी समितीची मान्यता घेणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती कडे पाठवणे योग्य

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ.सुरेश विलास घोलप यांची करारबध्द पुर्ननियुक्ती करणेकरीता पुर्व मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे दिनांक १६/०२/२०१५ पासून सहा महिन्याकरीता रूपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेकरीता पुर्व मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- १४८ सोमवार दिनांक- ३०/०३/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा दिनांक २/२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील दि.२/२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले एकुण ७ वायरमन यांना संदर्भिय कार्यालयीन आदेश दिलेला होता.सदर वायरमन यांची कंत्राटी पध्दतीने केलेली मुदत दि.०७/०८/२०१४ रोजी संपत आलेली असुन विदयुत विभागाकडे सध्या इलेक्ट्रीक साहित्य उपलब्ध आहे. परंतू तांत्रिक वर्ग नसल्याकारणाने नागरिक व नगरसेवकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. सध्या इलेक्ट्रीक विभागाकडील अहमदनगर महागनरपालिका आस्थापना सुचीवर कायम असलेले वायरमन संख्या १० इतकी असुन संपुर्ण शहरासाठी कायम कर्मचारी अपुरे पडतात. त्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या एकुण ७ वायरमन यांची अत्यंत आवश्यकता आहे. तरी अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या ७ वायरमन यांची मुदत संपलेली असल्याने त्यांना ६ महिनयाकरिता मुदतवाढीस मंजुरी मिळणेस व आस्थापना विभागामार्फत मुदत वाढीचे कार्यालयीन आदेश काढण्यास रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर" असे नमुद निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग ४७९ दि.०५/०२/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुभाष बापुराव सुळ व इतर ५ यांची तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था./ कंत्रटी करारबध्द नेमणूक ७४८० दिनांक ०७/०२/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.०७/०२/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता रूपये ६०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळाणसे व दरमहा मानधन वाढीबाबत सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्कशीट १७८ दि.१४/०२/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २२ दिनांक ८/७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला होता.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७४८० दिनांक ०७/०२/२०१४ अन्वये दिनांक ७/२/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.६०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेस व दरमहा मानधन वाढीबाबत निर्णयाकरीताच्या ऑफिस रिपोर्ट वर पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केलेल्या वायरमन यापदी १] सुभाष बापुराव सुळ ,२] लोंढे नवनाथ बाळासाहेब,३] महारपुडे कैलास भाउसाहेब,४] इकबाल सुलेमान सय्यद,५] देवरे गितेश आणासाहेब,६] काटकर लंकेश तुकाराम या कामगारांना तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच त्यांना दरमहा मानधन वाढवून रू.७५००/- करण्यात यावे.खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रिक खंड देउन पुढील तीन महिन्याकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी.या प्रक्रियेमधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्याच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रिया सुरू करावी व ज्या पदांवर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत, त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी"

सद्यस्थितीमध्ये सुभाष बापुराव सुळ व इतर ५ यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २२ दिनांक ८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३७३५ दि.२०/८/२०१४ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन दि.२२/८/२०१४ पासुन तीन महिन्याकरिता रूपये ७५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली होती.

सदर वरील संबंधीतांची तांत्रिक खंड देवुन तीन महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणूकीची मुदत ही दिनांक २१/११/२०१४ रोजी समाप्त झालेली आहे.

तसेच यापुर्वी इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग ५२५ दिनांक १२/०३/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डहाळे सौरभ भाउसाहेब यांची तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७८ दिनांक २५/०४/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.२५/०४/२०१४ पासून सहा महिन्या करीता रूपये ६०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र.आस्था. वर्कशीट ७९ दि.५/५/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २७ दिनांक ८/७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला होता.

ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७८ दि.२५/४/२०१४ अन्वये दिनांक२५/४/२०१४ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रू.६०००/- (अक्षरी रूपये सहा हजार) या मानधनावर केलेल्या कराराबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सद्यस्थितीमध्ये श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २७ दिनांक ८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने करारानुसार जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ५२२८ दि.२१/१०/२०१४ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन दि.२८/१०/२०१४ पासून तीन महिन्याकरिता मा. स्थायी समिती ठराव क्र.२२ दि.८/७/२०१४ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने रूपये ७५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली होती.

सदर वरील संबंधीतांची तांत्रिक खंड देवुन तीन महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही दिनांक २७/०१/२०१५ रोजी समाप्त झालेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार होवून करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ३७३५ दिनांक २०/८/२०१४ व जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ५२२८ दिनांक २१/१०/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन तीन महिन्याकरिता मानधनावर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधीतांची मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| ५ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| ६ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ७५००/- | २२/८/२०१४ | २१/११/२०१४ |
| ७ | डहाळे सौरभ भाउसाहेब | वायरमन | ७५००/- | २८/१०/२०१४ | २७/०१/२०१४ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये वायरमनची, मंजुर , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वायरमन | १८ | १४ | ४ |
| | वायरमन (५०६ पैकी) | ०१ | ०१ | ०० |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा. शासनाकडुन मंजुरी मिळालेली नाही.

यापुर्वी इकडील जा.क्र.आस्था.३७६७ दिनांक २१/०८/२०१४ अन्वये इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांना पत्र देउन त्यामध्ये "इलेक्ट्रीक विभागाकरीता तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्तीबाबत दिनांक ५/८/२०१४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असता सदर प्रस्तावावर विदयुत विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता कामगार घेणेकामी मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि २०१०/८४/१० विसु-१ मुंबई दि.२७ सप्टेंबर २०१० चे परिपत्रक व बाहय यंत्रणेकडून (आउट सोर्सिंगद्वारे ) कामे करून घेणेबाबत शासन परिपत्रक क्रमांकः क्र. पदनि २०१३/प्र.क्र.११/१३ / विसु-१ मुंबई दिनांक २ फेब्रुवारी २०१३ मधील मार्गदर्शक सुचना नुसार कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेले आहे. त्याप्रमाणे दि.५/८/२०१४ रोजीच्या प्रस्तावावरील उपरोक्त निर्देशित केल्यानुसार आपल्या विभागामार्फत आवश्यकत ती कार्यवाही करण्यात यावी. असे नमुद करून सुचीत केलेले होते.

तथापि इकडील जा.क्र.आस्था. ३७६७ दिनांक २१/०८/२०१४ अन्वये इलेक्ट्रीक विभाग यांना पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग यांनी त्याबाबत अद्यापपर्यंत परिपुर्ण कार्यवाही केल्याचे दिसुन येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

**५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र, कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कालम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रूपयाहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमूद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये वायरमन ही पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर आहेत. त्यामुळे इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील दिनांक ०२/०२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावामध्ये मागणी नमुद केल्याप्रमाणे त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरीने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची त्यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता पुढील सहा महिन्याकरीता करारानुसार रूपये ७५००/- या दरमहा मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रूपये ५२५००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे कडील दिनांक ०२/०२/२०१५ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये ७५००/- या दरमहा मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे

करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्यलेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयासतव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

अंदाजपत्रकीय तरतुद सन २०१४-२०१५

लेखाशिर्ष - मानधन

एकुण तरतुद रू.५६,१०,०००/-

झालेला खर्च रू.४७,६९,१४७/-

(माहे जाने. २०१५ पर्यत)

--------------------------------

शिल्लक तरतुद रू.८,४०,८५३/-

यावर प्र.सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मा.मु.ले.अ. व मा.मु.ले.प. यांचा अभिप्राय घेण्यात यावी.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, मनपा अधिनियम १९४९ च्या कलम ५३ नुसार कार्यवाहीस्तव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविणेस हरकत नसावी.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मा. स्थायी समिती ठराव क्र.२२ दि.८/७/२०१४ चे ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही. तथापि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ नुसार कार्यवाही आवश्यक ठरेल.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- या वायरमनांना दर ६ महिन्यांनाकरीता मुदत वाढ देण्याऐवजी एकदाच ११ महिन्यांची नेमणूक का देत नाही. त्यांचा पुन्हा प्रस्ताव येई पर्यंत वॉर्डात इलेक्ट्रीकची कामे करण्याकरीता वायरमन मिळत नाही. माझ्या वॉर्डात ४ महिन्यांपासून वायरमन नाही. संपूर्ण केडगाव विभागाकरीता १ वायरमन आहे. प्रस्ताव मुदत संपण्यापुर्वी का ठेवत नाहीत.

मा.श्री.सचिन जाधवः- झेंडीगेट विभागालाही वायरमन नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :- ५०६ पैकी १ वायरमन हे काय आहे.

श्री.अंबादास सोनवणे,आस्थापना प्रमुख :- ५०६ कर्मचा-यांना मा.कोर्टा ने कायम केले असल्याने या कर्मचा-यांना ५०६ कर्मचारी असे म्हणले जाते. त्यांचेमध्ये १ वायरमन म्हणून कर्मचारी आहे. आस्थापना सूची वर १८ व ५०६ कोर्ट कर्मचारी पैकी १ असे एकूण १९ वायरमन आहेत. पैकी ४ जागा रिक्त आहेत.

मा.श्री.दीप चव्हाण :- हद्द वाढीमुळे मनपात आलेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचा-यांमध्ये किती वायरमन आहेत.

मा.सभापती साहेब :- त्यामध्ये वायरमन कर्मचारी नाहीत.

मा.श्री.सचिन जाधव - मानधनावर देण्यात येणा-या वायरमन पैकी १ कर्मचारी आमच्या भागात देण्यात यावा.

मा.श्री.सावळे,इलेक्ट्रीक विभाग :- तुमच्या भागात असलेला कर्मचारी कायम आस्थापना सुचिवरील आहे तो सध्या रजेवर असल्याने अडचण निर्माण झाली आहे.

मा.श्री.दीप चव्हाण :- या ६ कर्मचा-यांमध्ये संपूर्ण शहरातील इलेक्ट्रीकचे काम चालणार नाही. वाढीव कर्मचा-यांचा रिपोर्ट देण्यात यावा.

मा. सभापती साहेब : - या कर्मचा-यांचे मानधन किती आहे.

मा.श्री.अंबादास सोनवणे आस्थापना प्रमुख :- रू.७५००/-दरमहा.

मा.सभापती साहेब :- या वायरमन कामगारांनी त्यांचे मानधन रू.१००००/- दरमहा करण्याचा अर्ज माझ्याकडे दिला आहे. त्यांचे काम आवश्यक व धोक्याचे असते त्यांना रू.९५००/- दरमहा मानधन करा.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा, मानधन रूपये ९,५००/- दरमहा करावे.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा, मानधन वाढवा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. हे कर्मचारी शहराला उपयुक्त काम करतात. त्यांनी मानधन वाढवून रू.१०,०००/- करण्याकरीता अर्ज माझेकडे दिला आहे.तथापी मानधनात वाढ करून मानधन रू.९,५००/-दरमहा इतके करण्यात यावे.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केलेल्या वायरमन या पदी १] सुभाष बापुराव सुळ ,२] लोंढे नवनाथ बाळासाहेब,३] महारपुडे कैलास भाउसाहेब,४] इकबाल सुलेमान सय्यद,५] देवरे गितेश आणासाहेब,६] काटकर लंकेश तुकाराम ७] डहाळे सौरभ भाउसाहेब यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास ऑफिस रिपोर्टानुसार पुर्व मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच हे कर्मचारी शहराला उपयुक्त काम करतात. त्यांनी मानधन वाढवून रू.१०,०००/- करण्याकरीता मा.सभापती , स्थायी समितीकडे दिलेल्या दिनांक २७/०३/२०१५रोजीच्या अर्जाचा विचार करता या ठरावाद्वारे दिल्या जाणा-या नियुक्ती पासुन मानधनात वाढ करून मानधन रू.९,५००/- दरमहा इतके करण्यात यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका